# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले

एम्.ए., पीएच् डी.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९

: ०२०-२५६२२६९०/९१

: ०२०-२५६२२६९२

: ०२०-२५६९७३४१


**रासेयो/२०२५-२६/२२२** **दि. २६/०८/२०२५**

**प्रति,**

**मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**

**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : 'सृजनरंग' सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धा जिल्हानिहाय व विद्यापीठस्तरावर आयोजन करणेबाबत (सन २५-२६)**

महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी **'सृजनरंग' सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धांचे** आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वरचित काव्यलेखन व वाचन स्पर्धा, निबंध, वक्तृत्त्व, भित्तीचित्र, पोवाडागायन व पथनाट्य या स्पर्धांचे जिल्हा व विद्यापीठस्तरावर आयोजन करण्यात आले आहे.

पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी पुढील तपशिलानुसार स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे कलाप्रकारात नैपूण्य असलेल्या आपल्या महाविद्यालयातील निवडक स्वयंसेवकांस स्पर्धेकरिता जिल्हानिहाय आयोजक महाविद्यालयांमध्ये पाठविणे आवश्यक आहे. जिल्हानिहाय स्पर्धेतील प्रत्येक कलाप्रकारातील प्रथम तीन क्रमांकास दि. २४ सप्टेंबर, २०२५ रोजी विद्यापीठस्तरावरील स्पर्धेत सहभागी होणे अनिवार्य आहे. संपूर्ण स्पर्धेची अधिक तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे.

| **निबंध, वक्तृत्त्व, पथनाट्य, पोवाडागायन, भित्तीचित्र, स्वरचित काव्यलेखन व वाचन स्पर्धा विषय, संघ व इतर माहिती** | | | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **स्पर्धा** | **विषय** | **नियमावली** |
| १ | काव्यवाचन | कवितेचा विषय सामाजिक आशयाचा असावा. (कविता स्वरचित असावी. सादरीकरण करण्यापूर्वी एक प्रत आयोजकांकडे जमा करण्यात यावी.) | **कविता** : स्वरचित असावी<br>**वेळ** : ३+२ मिनीट,<br>**भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी |
| २ | निबंध | १. स्वामी विवेकानंद आणि युवक<br>२. कुशल प्रशासक अहिल्यादेवी होळकर<br>३. वंदे मातरम : १५० वर्ष<br>४. एकात्म मानवता वाद आणि भारतीय समाज<br>५. क्रांतिवीर बिरसा मुंडा | **शब्द मर्यादा** : १००० शब्द,<br>**भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी,<br>**वेळ** : लेखनासाठी २ तास |
| ३ | वक्तृत्त्व | १. संविधान आणि भारतीय लोकशाही<br>२. व्यसनाधीन तरूण : कारणे व उपाय<br>३. भारतीय ज्ञानसंपदा आणि योग<br>४. मला भावलेल पुस्तक<br>५. शून्य कचरा व्यवस्थापन काळाची गरज | **भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी,<br>**वेळ** : ४ मिनीट+१ मिनीट |
| ४ | भित्तीचित्र | अवयवदान, व्यसनमुक्ती, योग साधनेचे महत्त्व व तणावमुक्ती, वंदे मातरम : १५० वर्ष, लिंगभाव संवेदीकरण, लोकसंख्यावाढ : समस्या व उपाय | **वेळ** : २ तास, **साहित्य** : फक्त कागद आयोजकांमार्फत देण्यात येईल. रंग व इतर आवश्यक साहित्य घेऊन यावे. |
| ५ | पोवाडा गायन | सामाजिक समस्यांवर आधारित पोवाडा गायन (उदा. व्यसनमुक्ती, स्वच्छता अभियान, लोकसंख्यावाढ यांसह इतर सामाजिक विषय) | **वेळ** : ३+२ मिनीट,<br>**संघ** : १+२ साथीदार |
| ६ | पथनाट्य | अवयवदान, व्यसनमुक्ती, योग साधनेचे महत्त्व व तणावमुक्ती, लोकसंख्यावाढ : समस्या व उपाय, वंदेमातरम : १५० वर्ष, भारताचे संविधान | **वेळ** : ८+२ मिनीट,<br>**संघ** : ८+२ विद्यार्थी |

वरीलप्रमाणे स्पर्धांचे जिल्हानिहाय पद्धतीने आयोजन करताना पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

**जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पुढील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.**

| क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | २६ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर, २०२५ | **महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर वरीलप्रमाणे स्पर्धांचे आयोजन करावे, यामध्ये वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ५ कलाप्रकाराकरिता महाविद्यालयातील किमान ५ स्पर्धक सहभागी होणे आवश्यक आहे, यामधून अ.क्र. १ ते ५ कलाप्रकाराकरिता प्रथम क्रमांकाची व अ.क्र.६ करिता ८+२ अशा संघाची निवड करावी. महाविद्यालयीनस्तरावर निवड झालेल्या स्वयंसेवकांची माहिती https://forms.gle/HtYEHchresTSVDxa8 या गुगल लिंकमध्ये दिनांक ०४ सप्टेंबर, २०२५ पूर्वी कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत भरणे अनिवार्य आहे. सदर स्पर्धकांस पुढील तपशिलानुसार जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पाठवण्यात यावे. ऑनलाईन नावनोंदणी केली नसल्यास जिल्हानिहाय स्पर्धेकरिता सहभागी होता येणार नाही.** |

**जिल्हानिहाय स्पर्धा वेळापत्रक**

| क्र. | विभाग व दिनांक | आयोजक महाविद्यालयाचे नाव | स्पर्धा समन्वयक अधिकारी नाव व संपर्क |
|---|---|---|---|
| १ | **पुणे शहर १२/०९/२०२५ स. ९.०० वा.** | श्री शिवाजी मराठा सोसायटीचे समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे | **डॉ. शिवाजी पाचारणे/डॉ. अमित गोगावले** रासेयो, जिल्हा समन्वयक, पुणे शहर ९८२२६२६७७८/९९२२०७४८४७ |
| २ | **पुणे ग्रामीण ९/०९/२०२५ स. ९.०० वा.** | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे | **डॉ. सारिका मोहोळ** रासेयो, जिल्हा समन्वयक, पुणे शहर ९०४९२३३५०५ |
| ३ | **अहिल्यानगर १०/०९/२०२५ स. ९.०० वा.** | अ.जी.म.वि.प्र.स., न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लालटाकी रोड, अहिल्यानगर | **डॉ. गणेश निमसे** रासेयो, जिल्हा समन्वयक, अहिल्यानगर ९४०४२८१८२८ |
| ४ | **नाशिक १३/०९/२०२५ स. ९.०० वा.** | गोखले एज्युकेशन सोसायटीचे एच.पी.टी. आर्ट्स अँड आर.वाय.के. विज्ञान महाविद्यालय, प्रा. टि.ए. कुलकर्णी विद्यानगर, नाशिक | **प्रा. सागर वराडे/प्रा.डॉ. रविंद्र आहिरे** कार्यक्रम अधिकारी/जिल्हा समन्वयक ९२०९४३७३३५/९७६५२१९४२२ |

आयोजक महाविद्यालयांनी जिल्हानिहाय स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरिता पुढील तपशिलानुसार पाठवण्यात यावे.

**विद्यापीठस्तरीय स्पर्धा तपशील**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **दि. २४ सप्टेंबर, २०२५ स. ९.०० वा.** | संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ०२०-२५६२२६८८,८९,९०,९१ |

टिप : विद्यापीठस्तरीय स्पर्धांचे विषय जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणेच राहतील याची स्पर्धकांनी नोंद घ्यावी.

तरी वरीलप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरावर सहभागी होण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी पाठवण्यात यावेत. जिल्हा व विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी स्वयंसेवक यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*टिप :* *१. प्रत्येक कलाप्रकारात सहभागी होणे अनिवार्य नाही.*
*२. गुगल लिंकद्वारे माहिती फक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनीच भरावी. अन्यथा प्रवेशिका रद्द करण्यात येईल.*